अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– ०१/०४/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | १३/२०२५ |
| कलम | कलम ७(अ), १२ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) विशाल मारुती येरापल्ले, ३५ वर्षे, खाजगी इसम (एजंट)<br>२) श्री. गजानन प्रल्हाद खोत, ४८ वर्षे, सह दुय्यम निंबधक,<br>कार्यालय : सह दुय्यम निबंधक वर्ग २, मुंबई ११ कार्यालय, खार टेलिफोन एक्सचेंज, तळमजला, खार पश्चिम, मुंबई |
| लाचेची मागणी | रू. ५५,०००/- तडजोडीअंती रू. ३५,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ३५,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या फ्लॅटचे रजिस्टेशन सह दुय्यक निबंधक कार्यालय मुंबई ११, खार विभाग, मुंबई येथे दिनांक १८/०३/२०२५ रोजी केले होते. सदर रजिस्टेशनचे मुळ कागदपत्रे मिळवून देण्याकरीता श्री. विशाल मारूती येरापल्ले, खाजगी इसम (एजंट) यांने सह दुय्यम निबंधक यांच्यावतीने तक्रारदार यांच्याकडे रु. ५५,०००/- इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २८/०३/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून तक्रार दिली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/०३/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, श्री. विशाल येरापल्ले, खाजगी इसम(एजंट) यांनी तक्रारदार यांच्या कामाकरीता लोकसेवक श्री. गजानन खोत यांच्यावतीने तडजोड करुन रु. ३५,०००/- इतक्या रक्कमेच्या लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तात्काळ करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्याने खाजगी इसम(एजंट) श्री. विशाल येरापल्ले यांनी तक्रारदार यांच्याकडून लाचेची रक्कम रू. ३५,०००/- स्विकारली व स्विकारलेल्या रक्कमेपैकी रू. ३२,०००/- स्वःताच्या खिशात ठेवून उर्वरीत लाचेची रक्कम रू. ३,०००/- लोकसेवक श्री. गजानन खोत यांच्या टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली. नमूदवेळी लोकसेवक यांनी खाजगी इसमास सदर कृत्य करण्यास अपप्रेरणा दिली. त्यामुळे खाजगी इसम(एजंट) श्री. विशाल येरापल्ले व लोकसेवक श्री. गजानन खोत यांना लाचेच्या रक्कमेसहीत रंगेहाथ पकडण्यात आले. पंचनामा कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांच्या टेबलच्या ड्रॉव्हर व बॅगची झडती घेतली असता, एकुण रु. १,९४,४५०/- इतकी रक्कम मिळून आली असून सदरहू रक्कम देखील ताब्यात घेण्यात आली. म्हणून उपरोक्त नमूद लोकसेवक व खाजगी इसम यांच्या विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७(अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

तपास अधिकारी :- श्री. निलेश पाटील, पोलीस निरीक्षक पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. दयानंद सावंत, सहाय्यक पोलीस आयुक्त
मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. अनिल तुकाराम घेरडीकर, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**
टोलफ्री क्र. १०६४, दुरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट:–** acbmaharashtra.gov.in, **ईमेल:–** acbwebmail@mahapolice.gov.in
**मोबाईल ॲप:–** www.acbmaharashtra.net
**ईमेल:–** addlcpacbmumbai@mahapolice.gov.in **फेसबुक :–** www.facebook.com - Maharashtra ACB